**कृपया प्रसिध्दीसाठी** **29 सप्टेंबर 2011**

## कोट्यावधींचा महसूल देणारा आरे रस्ता नादुरुस्तच

**मुंबई, गुरुवार :** दर वर्षी टोलद्वारे कोट्यावधी रुपयांचा महसूल मिळूनही महाराष्ट्र सरकार आरे वसाहतीतील धोकादायक रस्ते दुरुस्त करीत नसल्याबद्दल माजी पेट्रोलियम मंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे नेते श्री. राम नाईक यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

कंत्राटदाराशी झालेल्या करारानुसार दररोज जवळ - जवळ दीड लाख रुपयांचा महसूल आरे वसाहतीतील रस्त्यांवर वसूल केल्या जाणा-या टोलमधून सरकारी तिजोरीत जमा केला जातो. गेल्या तीन वर्षात त्यामुळे सुमारे 17 कोटी रुपयांचा महसूल आरे रस्त्यामुळे सरकारला मिळाला आहे. याखेरीज कंत्राटदारालाही प्रचंड नफा मिळाला आहे. मात्र इतका फायदा करुन देणारा हा अवघा साडेसात किलोमीटरचा रस्ता अनेक अपघातांना कारणीभूत ठरत आहे. कोट्यावधी रुपयांचा फायदा देणारा हा रस्ता अतिशय खराब झालेला असतानाही सरकारने त्याच्या दुरुस्तीवर गेल्या वर्षी रु. 36 लाख 80 हजार खर्च केले तर यावर्षी अवघे दहा लाख रुपये खर्च केले आहेत, असा गौप्यस्फोटही श्री. राम नाईक यांनी केला.

विशेष म्हणजे टोलचा महसूल कंत्राटदाराने थेट राज्य सरकारच्या तिजोरीत भरला असला, तरीही रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कोणतीही ठोस योजना सरकारने आखलेली नाही. एका बाजूला दररोज होणारे अपघात, तर दुसरीकडे टोलच्या रुपाने वसूल होणारा जिझिया कर यांमुळे स्थानिक जनता त्रस्त आहे. आता पावसाळा संपला असल्याने रस्ता दुरुस्ती न करण्यासाठी सरकारकडे कोणतेही कारण नाही. तेव्हा आता नागरिकांचा अधिक अंत न पहाता तातडीने सरकारने हा रस्ता दुरुस्त करावा नाही तर उग्र आंदोलन केले जाईल, असा स्पष्ट इशारा श्री. राम नाईक यांनी दिला आहे.

**(कार्यालय सचिव)**